# डॉक्टरकाकांकडे गेल्यावर



लेखन - संजीवनी कुलकर्णी

चित्रे - माधुरी पुरंदरे

डॉक्टरकाकांकडे गेल्यावर

© प्रयास २००६

प्रयास

आरोग्य, उर्जा, शिक्षण आणि पालकत्व
या विषयातील विशेष प्रयत्न

संभाजी पूल कोपरा,
कर्वे रस्ता, पुणे ४११ ००४.
फोन : २५४४१२३०
फॅक्स : २५४२०३३७
E-mail : prayashealth@vsnl.net
Web site : www.prayaspune.org

मांडणी अणि छपाई
ग्रीन ग्राफिक्स, पुणे फोन : २४४५४६२७
E-mail : green.graphics@vsnl.net

**ही पुस्तिका ॲबट फंड, यु.एस.ए. ह्या संस्थेच्या आर्थिक साहाय्यातून 'प्रोजेक्ट-सॅच्युरेशन सोलापूर' या प्रकल्पासाठी तयार झाली आहे.**

This book has been prepared with financial support from Abbott fund, USA as part of 'Project-Saturation Solapur'.

एच् आय् व्ही /अेड्स, कर्करोग, क्षयरोग अशा गंभीर रोगांनी जेंव्हा लहान मुलं आजारी पडतात, तेंव्हा तऱ्हेतऱ्हेच्या तपासप्रक्रिया आणि दीर्घकाळ औषध घेण्याला पर्याय नसतो; त्याबद्दल लहान मुलांशी बोलताना ह्या पुस्तिकेचा उपयोग होऊ शकेल. असा उपयोग आपण केलात तर आम्हाला जरूर कळवा.

# डॉक्टरकाकांकडे गेल्यावर



लेखन -संजीवनी कुलकर्णी • चित्रे - माधुरी पुरंदरे

जगात खूप माणसं असतात.
काही गोरी,
काही काळी,
काही बुटकी,
काही उंच,
काही पुरुष,
काही स्त्रिया,
काही मोठी माणसं
आणि काही लहान मुलं.





ही सगळी माणसं
कधीकधी आजारी पडतात।

सगळ्यांना वेगवेगळे आजार होतात।
मग ती डॉक्टरांकडे जातात।



डॉक्टर त्यांना तपासतात,
आणि बरं होण्यासाठी
औषधं देतात.

कधी गोळ्या,
कधी पातळ औषध देतात,
तर कधी इंजेक्शनसुद्धा.



कधीकधी तर,
आजारी माणसांनी
पूर्ण विश्रांती घ्यावी म्हणून
त्यांना हॉस्पिटलातच
झोपवून ठेवतात.



पण कधीकधी
डॉक्टरांनाही आजार लौकर
कळतच नाहीत.







मग त्यासाठी डॉक्टर
आजारी माणसाचं रक्त तपासतात,
डॉक्टरमावशी छोटीशी सुई घेतात
आणि हळूच रक्त काढून घेतात.
सुई बघितल्यावर कधीकधी भीती वाटते,
पण दुखत नाही काही;
फक्त मुंगी चावल्यासारखं वाटतं.

कधी सोनोग्राफी करतात.
कधी तर,
मोठ्या यंत्राच्या
आत झोपवून
कसले कसले फोटो काढतात.

एवढं सगळं केल्यावर,
त्या माणसाला काय झालंय
हे डॉक्टरांना कळलं की,
सुरू करायची औषधं.





काही आजार असे असतात की,
थोड्या औषधांनी बरे होतात;
तर काही आजार
अगदी त्रास देतात.
लौकर बरेच होत नाहीत.
अशा वेळी खूप दिवस
औषधं घ्यावी लागतात.

औषधं अगदी नियमितपणे
घ्यावी लागतात.
एक दिवससुद्धा
औषध घ्यायचं चुकलं की,
आजार लगेच त्रास द्यायला लागतो.
काही आजार तर
विचित्रच असतात.
आई-बाबांना झाले की
मुलांना पण होऊ शकतात..
मग आई-बाबांबरोबर
आजारी मुलांनाही औषध घ्यावं लागतं.







म्हणून औषधांचे डोस
समजून घ्यायचे ।
अजिबात न विसरता
औषधं रोज घ्यायची ।



औषधं घ्यायची विसरली
तर काही मुलांची आई,
किंवा बाबा,
किंवा कधीकधी तर
आई आणि बाबा,
दोघंही खूप आजारी पडतात।



मग, अशा आई–बाबांना
वेळेवर औषधं घ्यायची
आठवण करावी लागते।





पाण्यात जसे
जंतू असू शकतात,
तसे रस्त्यावर मिळणाऱ्या
खाण्यातही असू शकतात.
भेळ, आईस्क्रीम,
बर्फाचे गोळे, पाणीपुरी...
पाणी सुटलं ना तोंडाला?
पण अशा बाहेरच्या खाण्यातून
जंतू पोटात जाऊ शकतात.

आपण आधीच आजारी
पडलेलो असलो तर,
हे जंतू येऊन
आपला आजार
अजून वाढवतात.

म्हणून,
कितीही खावंसं वाटलं तरी,
शहाणी मुलं जंतू असलेला खाऊ
खाण्याचा हट्ट धरतच नाहीत.





ही अशी शहाणी मुलं
मग लौकर लौकर
बरी व्हायला लागतात.
मोठी मोठी होतात.

आणि, शहाणी मुलं तर
सगळ्यांनाच आवडतात;
आई-बाबांना,
मामा-मामीला,
काका-काकीला,
आजी-आजोबांना,
गुरूजींना,
बाईंना
आणि...



# डॉक्टरकडे जाताना.....



'प्रयास' ही आरोग्य, ऊर्जा, शिक्षण व पालकत्व आणि संसाधने व उपजीविका
या क्षेत्रांत काम करण्यासाठी स्थापन करण्यात आलेली सार्वजनिक विश्वस्त संस्था आहे.